# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.०५/०६/२०२४

आरोपी लोकसेवक सचिन शिवाजीराव बांगर वय-३९ वर्ष, पद कार्यालयीन अधिक्षक जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम जि.वाशिम,यांना २,५००/- रुपयेची लाच स्विकारले प्रकरणात गुन्हा नोंद बाबत.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | सचिन शिवाजीराव बांगर वय-३९ वर्ष, पद कार्यालयीन अधिक्षक जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम जि.वाशिम रा.बेलदारपुरा ता.जि.हिंगोली |
| लाच मागणी रक्कम | ३,०००/-रुपये तडजोडी अंती २५००/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २,५००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे पत्नीचे वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक पडताळुन सही शिक्का घेण्याकरीता लाचेची मागणी केली. |
| सापळा अधिकारी | गजानन आर शेळके लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदार यांचे पत्नीचे वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक पडताळुन सही शिक्का घेण्याकरीता२५००/- रु. लाचेची मागणी केल्याची दि. ०५/०६/२०२४ रोजी तक्रार प्राप्त झाली.

दि. ०५/०६/२०२४ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे पत्नीचे वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक पडताळुन सही शिक्का घेण्याकरीता३०००/- रु लाचेची मागणी केली व तडजोडी अंती २५००/- रु स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

दि. ०५/०६/२०२४रोजी सापळा कार्यवाहीचे आयोजन केले असता आरोपी लोकसेवक सचिन बांगरयांनी तक्रारदार यांच्या कडून लाच रक्कम २५००/- रुपये स्विकारल्याने आरोपी लोकसेवक यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन वाशिम शहर जि. वाशिम येथे गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक अनिल पवार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती यांचे मार्गदर्शनात पोलीस उपअधिक्षक गजानन आर शेळके,व अंमलदार पोहेकॉ,नितीन टवलारकर,विनोद मार्कंडे,योगेश खोटे ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकसेवकाने किंवा खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन गजानन आर शेळके,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं. - १०६४
गजानन आर शेळके-९४२३३३८४२४

5/6/24

पोलीस उपअधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो • वाशिम •

( गजानन आर शेळके )
पोलीस अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.